अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१६-१७
मागणी क्र.वाय-३ ,२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण (योजनेतर) (२२३५२४२१)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-१६१७/प्र.क्र.३०४/पापु-१५

सातवा मजला , गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
तारीख: २५ ऑक्टोबर,२०१७

वाचा -

शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः अर्थसं -२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दिनांक १८.४.२०१७.

प्रस्तावना-

वित्त विभागाने दिनांक १८.०४.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०१७, नुसार वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या एकुण अर्थसंकल्पीय योजनांतर्गत व योजनेतर तरतूदींपैकी ८० % निधी सन २०१७-१८ च्या पहिल्या नऊ महिन्यांकरिता (डिसेंबर २०१७ अखेर) अर्थसंकल्पीय प्रणालीवर उपलब्ध करुन दिला आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा विभाग (खुद्द) व पाणी पुरवठा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणे अतंर्गत कार्यरत असताना मृत झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या वारसांना महाराष्ट्र सर्वसाधारण नियम भविष्य निर्वाह निधी नियम ३० मधील तरतूदीनुसार ठेव संलग्न विमा योजनेअंतर्गत २२३५२४२१ या लेखाशीर्षाखाली देय रकमांचा खर्च भागविण्यासाठी रु. ७,२०,०००/- इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार एकुण तरतूदीच्या ८० % या मर्यादेपर्यंत आस्थापनाविषयक खर्च भागविण्यासाठी " २२३५ २४२१ सामाजिक सुरक्षा व कल्याण " या लेखाशीर्षाखाली मंजुर झालेले लेखानुदान संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ,पुणे यांना उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे.

शासन निर्णय-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा विभाग (खुद्द) व पाणी पुरवठा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणे अतंर्गत कार्यरत असताना मृत झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या वारसांना महाराष्ट्र सर्वसाधारण नियम भविष्य निर्वाह निधी नियम ३० मधील तरतूदीनुसार ठेव संलग्न विमा योजनेअंतर्गत २२३५२४२१ या लेखाशीर्षाखाली देय रकमांचा खर्च भागविण्यासाठी रु.७,२०,०००/- इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील कर्मचा-यांसाठी ठेव संलग्न विमा योजनेंअतर्गत सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षात माहे एप्रिल २०१७ ते डिसेंबर २०१७ अखेर पर्यंत अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर रु.३,७९,२००/- इतके अनुदान संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , पुणे यांना या शासन निर्णयाद्वारे मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

२. संचालक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , पुणे यांनी अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या निधी इतका खर्च होईल याबाबत दक्षता घ्यावी.

३. या बाबीवरील खर्च मागणी क्र. वाय -३,२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण ,६०-इतर खर्च सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम ,१०४- ठेव संलग्न विमा योजना (०१) (०१) शासकीय भविष्य निर्वाह निधी (२२३५२४२१) (दत्तमत) ५० इतर खर्च या प्रधान लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१३१५१००१९६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kirti Bhargav Mohite

Digitally signed by Kirti Bhargav Mohite
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4fd3368ed44d23d93e3830120928bdacd060fe0f33e2468a24ec3933dcb9ed97, cn=Kirti Bhargav Mohite
Date: 2017.10.25 16:43:54 +05'30'

(कीर्ती मोहिते)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , पुणे
२. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
३. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , सर्व

४. उप अभियंता (यां), भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , सर्व
५. महालेखापाल , महाराष्ट्र १ मुंबई/२ नागपूर (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
६. वित्त विभाग, अर्थसंकल्प १६ (२ प्रती)
७. कक्ष अधिकारी /लेखा अधिकारी पापु-०४, पापु-२०
८. निवड नस्ती पापु-१५